# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

दुरध्वनी : ०७१२-२६६०९४७ Email: directornss@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/रासेयो/१७/२५४/२०२५
दिनांक : ११/११/२०२५

प्रति,

**मा. प्राचार्य /**
कार्यक्रम अधिकारी रासेयो,
अमरावती जिल्हा संलग्नित महाविद्यालय,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**विषय :- आपल्या महाविद्यालयामध्ये एच.आय.व्ही./एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी आरआरसी उपक्रमाअंतर्गत रेड रिबन क्लब स्थापन करण्याबाबत.**

संदर्भ :- १) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे
पत्र क्र.मरायएनिसं/माशिसं/आरआरसी/२५-२६/४६४९-८१. दि. १६/०९/२०२५.
२) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्नालय, अमरावती यांचे
पत्र क्र. सारुअ/डापकू/आरआरसी/४३१४६/२५. दि. ०६/११/२०२५.

**मा.महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, एड्सवर पुर्णपणे मात करण्याकरीता कोणतेही औषध वा लस अद्यापी उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थाद्वारे रेड रिबन क्लब मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थीनीं पर्यंत एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यात येते महाविद्यालयातील युवकांना माहिती देणे, लैंगिक वर्तन अधिक जबाबदार बनवीने, रक्तदानाचे महत्व विषद करणे आणि अधिक निरोगी वातावरण तयार करणे. रेड रिबन क्लब मार्फत वर्षभर जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात त्यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी करावे.

रेड रिबन क्लब मार्फत महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते तसेच त्यांच्याद्वारे इतर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे आयोजित केलेल्या उपक्रमामध्ये तसेच कॅम्पच्या ठिकाणी व्यापक व प्रभावीपणे जनजागृती करावी. तसेच आपल्या रासेयो उपक्रमामध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिन (१२ ऑगस्ट), राष्ट्रीय युवा दिन (१२ जानेवारी) व जागतीक एड्स दिन (१ डिसेंबर) तसेच वर्षभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यात यावी. जेनेकरुन विद्यार्थी-विद्यार्थीनीमध्ये एचआयव्ही/एड्स, गुप्त रोग/प्रजनन मार्गातील संसर्ग हे आजार कसे होतात व कसे होत नाहीत तसेच आजाराला प्रतिंबध कसा करावा याबद्दल संपुर्ण माहिती होईल.

तेव्हा एचआयव्ही/एड्स आजाराचे उच्चाटन करण्याकरीता एचआयव्ही संसर्ग मुक्त करण्याकरीता आपल्या **महाविद्यालयामध्ये रेड रिबन क्लब स्थापन करण्याबाबतची कार्यवाही करावे तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्नालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने जनजागृतीपर कार्यक्रम, कार्यशाळा, पथनाट्य, रॅली, इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करावे** व त्याबाबतचा अहवाल विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या nssamt.com या वेबसाईटवर Submit करावा ही विनंती.

आपला

(डॉ. निलेश कडू)
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतीलीपी :
मा. कुलगुरु/अध्यक्ष राष्ट्रीय सेवा योजना संगाबा अवि.
मा. कुलसचिव संगाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

कार्यक्रम अधिकारी
रा.से.यो.
श्रीमती ना.वा.क.महा.
यवतमाळ-४४५ ००१

प्राचार्य
श्रीमती नानकीबाई वाधवानी
कला महाविद्यालय, यवतमाळ

NSS

## NSS Regular Activity (रा.से.यो. नियमित कार्यक्रम)

# Organization of Red Ribbon Club in the College

## Organization of Red Ribbon Club in the College

**Name of the Programme (कार्यक्रमाचे नाव) (English):** Organization of Red Ribbon Club in the College

**Name of the Programme (कार्यक्रमाचे नाव) (Marathi):** Organization of Red Ribbon Club in the College

**Organizer/ Collaboration (आयोजक/संयुक्त विद्यमाने) :** -

**Date (कार्यक्रमाची दिनांक) :** 04-12-2025

**Venue (कार्यक्रमाचे ठिकाण) :** Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya Yavatmal

**Chairperson (कार्यक्रमाचे अध्यक्ष) :** Dr.Jayant M. Chatur

**Chief Guest/ Speaker (प्रमुख पाहुणे/वक्ते) :** -

**Number of Students Participated/Benefitted (सहभागी/लाभार्थी विद्यार्थी संख्या) :** 57

**Number of Teachers Participated/Benefitted (सहभागी/लाभार्थी प्राध्यापक संख्या) :** 11

**Number of Villagers/Citizens Participated/Benefitted (सहभागी/लाभार्थी गावकरी संख्या) :** -

**Programme Outcomes (कार्यक्रमाचे फलित/उपयुक्तता/निष्पत्ती):**

- The aim of the programme is to create awareness about AIDS.

**Programme Short Report (कार्यक्रमाचा वृत्तांत):**

The NSS Dept. of Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya Yavatmal has established "Red Ribbon Club" on dated 4 December 2025. The president of the club is Dr. Jayant M. Chatur Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya Yavatmal. The intention of the programme is to create awareness about HIV AIDS, Its focuses on educating people about the virus that attacks the immune system, its transmission (sexual contact, shared needles, mother-to-child), prevention and the importance of testing, as the only way to know your status is to get tested, with treatment allowing people to live long.








,कोथुर्ला, सावंगी, कोसारा, दापोरा ईत्यादी ९ शाळांनी सहभाग घेतला आहे

### रासेयो रेड रिबन क्लब ची स्थापना

**नमो महाराष्ट्र । यवतमाळ**

**यवतमाळ** : जिल्हा विकास समिती यवतमाळ द्वारा संचालीत श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय यवतमाळ येथे दि 4 डिसेंबर 2025 रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे महाविद्यालयामध्ये रेड रिबन क्लब ची स्थापना आली एड्स नियंत्रण एचआयव्ही, एड्स विषय जनजागृती करण्याच्या संदर्भात युवकांना माहिती देणे, लैंगिक वर्तन तसेच रक्तदानाचे महत्त्व विशद करणे आणि अधिक निरोगी वातावरण तयार करणे हा या क्लबचा मुख्य उद्देश असून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्यात यावी या उद्देशाने क्लब ची स्थापना करण्यात आली. वर्षभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून एचआयव्ही एड्स विषयी जनजागृती करणे गुप्तरोग, प्रजनन मार्गातील संसर्ग हे आजार कसे होतात व कसे होत नाहीत तसेच आजाराला प्रतिबंध कसे करावे याविषयी संपूर्ण माहिती या क्लबच्या माध्यमातून देण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत चतुर उपस्थित होते. महाविद्यालयातील प्रा. दिगांबर वानखेडे (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना) प्रा. डॉ. कल्पना गोडघाटे, प्रा. डॉ. सुरेखा मंत्री प्रा. डॉ. रश्मी प्रविण गजरे प्रा. वंदना इंगोले, प्रा. डॉ. सिद्धार्थ जाधव, प्रा. डॉ. संजय राचलवार, प्रा. डॉ. राजाभाऊ बाजड, प्रा. नितु शेंडे, प्रा. डॉ. सुरेखा मंत्री शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रम अधिकारी
रा.से.यो.
श्रीमती ना.वा.क.महा.
यवतमाळ-४४५ ००१

प्राचार्य
श्रीमती नानकीबाई वाधवानी
कला महाविद्यालय, यवतमाळ